TODAY सकाळ edu प्राइम
पालकांसाठी



मुलांच्या विश्वात...

श्रुती पानसे

# अभ्यासाला मदत झोपेची!

आपलं डोकं कायम ठिकाणावर राहावं असं वाटत असल्यास मेंदूला विश्रांती देणं अत्यावश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकालाच रात्री आठ तासांची पूर्ण आणि शांत झोप हवी असते. जागेपणी मेंदू सततच कोणत्या ना कोणत्या कामात गुंतलेला असतो. अभ्यास, खेळ, टीव्ही, भांडणं असं वरंच काही आसपास सुरू असतं! थोडक्यात काय, तर आपली पंचेंद्रियं सतत नवनवीन माहिती गोळा करत असतात. ही माहिती स्वीकारण्याचं मेंदूचं काम अव्याहत चाललेलं असतं, असं संशोधकांनी सिद्ध केलं आहे; पण नुसतीच माहिती स्वीकारून चालत नाही, तिचा नीट अर्थ लावणंही आवश्यक असतं.

जोनाथन विल्सन या संशोधकानं प्रामुख्यानं झोप आणि अभ्यास या विषयात संशोधन केलं आहे. रात्री आपण झोपल्यावर दिवसभरात घडलेल्या छोट्या-मोठ्या गोष्टी तपासण्याचं काम मेंदू सुरू करतो. ज्या गोष्टी पुढच्या दिवसासाठी आवश्यक आहेत, त्या स्मरणशक्तीत साठवल्या जातात. तसंच ज्या गोष्टी बिनमहत्त्वाच्या आहेत, असं मेंदूला वाटतं, त्या फार तर एक-दोन दिवस स्मरणात ठेवल्या जातात. हे काम न थकता, रोजच्या रोज रात्री सुरू असतं. तेही आपल्या नकळत! आपल्याला ज्या गोष्टी कायमस्वरूपी किंवा जास्तीत जास्त काळ स्मरणात राहाव्यात असं वाटतं त्याबद्दल मेंदूला खास सूचना द्यावी लागते. 'हे लक्षात ठेवायचं आहे,' असं सांगावं लागतं. म्हणजे ते लक्षात राहतं. नाहीतर आहेच '....मागचं सपाट!!'

ज्या रात्री आपल्याला कमी झोप मिळते, त्याच्या दुसऱ्या दिवशी अजिबातच उत्साही वाटत नाही. झोप येत राहते. हातून चुका होतात. कंटाळा येतो. कधी एकदा हा दिवस संपतोय असं होतं. असं होऊ नये म्हणून जागरण टाळावं. आठ तास नीट झोप फार आवश्यक असते. अनेकदा मुलं रात्री जागतात. टीव्ही बघत बसतात. झोप येत असली, तरी डोळे ताणून ताणून टीव्हीच्या स्क्रीनकडं बघत राहतात. त्याच वेळी काहीतरी भीतीदायक दृश्यं दिसली, चित्रविचित्र, भयानक आवाज आले, गुन्हेगारीवरच्या गोष्टी बघण्यात आल्या, युद्ध, मारामारी असं काही पाहिलं, की मनात तेच रेंगाळत राहतं. जागणं म्हणजे आधीच मेंदूवर ताण, त्यातून अशी दृश्यं म्हणजे मेंदूला ताण आणि शिवाय त्रासही! म्हणून ते टाळलंच पाहिजे.



### टिप्स

**सुदृढ आरोग्यासाठी गाढ झोप घेणं अत्यावश्यक आहे. 'लवकर निजे, लवकर उठे, तया ज्ञान, संपत्ती, आरोग्य लाभे' असं म्हटलं जातं. पुरेशी झोप घेणारी मुलं नेहमीच प्रसन्न दिसतात. झोपेचं महत्त्व सांगणाऱ्या टिप्स...**

- स्मरणशक्ती सशक्त राहते.
- शरीराचं योग्य पोषण होतं.
- कांती उजळते.
- मुलांची रोगप्रतिकारशक्ती वाढते, आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते.
- मुलं दिवसभर उत्साही, प्रसन्न दिसतात.
- डोळ्यांवर अवेळी झापड येत नाही.

जोपासना पालकत्वाची

अंजली पेंडसे

# आपलेपणाचे कौतुक

स्मिताच्या काही दिवसांपासून लक्षात आलं होतं, की तिची मुलगी सोनल उगीचच चिडचिड करत होती. विशेषतः आईवर! शाळेमध्ये सोनल हुशार विद्यार्थिनी समजली जात होती. अभ्यासाइतकीच ती विविध खेळांमध्येही प्रवीण होती. स्मिताला तिचा अभिमान होता. ती सोनलच्या खाण्याकडं, सवयींकडं नीट लक्ष देत होती; पण अलीकडं सोनलचं काहीतरी बिघडलं होतं. आता-आतापर्यंत स्मिताबरोबर अनेक समारंभ, व्याख्यानांना आनंदानं बरोबर येणारी सोनल आता येणं टाळत होती. स्मिता नावाजलेली उद्योजिका असून, स्वतःच्या बिझनेसकडं लक्ष देत ती भरपूर सामाजिक कार्य करते. त्यामुळं शहरातल्या अनेक कार्यक्रमांना तिला आवर्जून आमंत्रण असतं. कधी-कधी त्यात तिचाही सहभाग असायचा. "ही माझी मुलगी. खेळात आणि अभ्यासातही खूप हुशार आहे," अशी सोनलची ओळख स्मिता करून द्यायची. लोकही सोनलचं कौतुक करायचे.

या वर्षी सोनलनं शाळेमध्ये अनेक खेळांमध्ये बक्षिसं मिळवली होतीच. इंटरस्कूल स्पर्धांमध्येही शाळेला भरपूर बक्षिसं मिळाली होती. शाळेच्या मोठ्या पटांगणावर बक्षीस वितरण समारंभ होणार होता. शहरातल्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, खेळाडू तसेच प्रतिष्ठित व्यक्ती येणार होत्या. सर्वोत्तम खेळाडूस दिल्या जाणाऱ्या ट्रॉफीवर सोनलचं नाव होतं. तिच्या स्पोर्टस टीचरनं घरी येऊन सोनलच्या पालकांना या समारंभास येण्याची विनंती केली होती. सोनलचे बाबा बाहेरगावी गेले होते; पण त्यांच्या आग्रहाला मान देऊन स्मिता जाणार होती. शाळेतून एक स्पेशल बसच ठरवली होती जाण्यासाठी.

समारंभाच्या दिवशी सोनल म्हणाली, "आई, तू नका येऊस. फक्त दीपाची आई येणार आहे. बाकी कोणाचे पेरेंट्स नाहीत." स्मिता म्हणाली, "सोनू, मला तुला ट्रॉफी घेताना बघायचंय. मी नक्की येणार आहे." ठरल्यावेळी स्मिता शाळेत पोचली. समारंभाला नेणारी बस उभीच होती. स्मिता-सोनल बसमध्ये चढताच सगळ्या मुली, "ए, ती बघ सोनलची आई," असे म्हणू लागल्या. सीटवर बसल्यावर सोनल म्हणाली, "बघ आई, इथं तुला सोनलची आई म्हणून ओळखतात." स्मिता हसली!

समारंभाहून घरी आल्यावर स्मितानं सगळ्या बक्षिसांसह सोनलचा फोटो काढला. तिला जवळ घेऊन तिच्या कपाळाचा पापा घेत म्हणाली, "सोनू, आय ॲम सो प्राऊड ऑफ यू!" अगं प्रत्येक आई-बाबांचं स्वप्न असतं, आपली मुलं एवढी कर्तृत्ववान असावी, की त्यांच्या नावानं आपण ओळखले जाऊ! मला आणि बाबांना तुझा अभिमान आहे. तुझी आई म्हणून असलेली माझी ओळख मला आणखीनच प्रिय आहे. सगळं जग कौतुक करतं; पण ते पाहायला आपले घरचे, कुटुंबातील लोक असले, की 'सोने पे सुहागा' असल्यागत होतं, नाही का!" नंतरच्या आठवड्यात स्मिताचं एका ठिकाणी व्याख्यान होतं. सोनल आपणहून म्हणाली, "आई, मी येते तुझ्याबरोबर..."

# राष्ट्रपतींच्या मुलीने शिकविला धडा

नवी दिल्ली, ता. १३ (वृत्तसंस्था) : राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांची कन्या शर्मिष्ठा यांच्या मुलीला अश्लील मेसेज पाठवण्याचा प्रताप एकाने केला; पण त्याला जगासमोर आणून त्याच्यासारख्या प्रवृत्तीला सोशल मीडियावर धडा शिकण्याचे काम शर्मिष्ठा यांनी केले.

शर्मिष्ठा यांनी स्वतः या घटनेची फेसबुकवर माहिती दिली. त्यांनी आपल्या मेसेजमध्ये अधिकाधिक लोकांना टॅग करून मेसेज शेअर करण्याचे आवाहनही केले आहे. शर्मिष्ठा फेसबुकवरील पोस्टमध्ये म्हणतात, 'पार्थ मंडल नावाचा माणूस मला अश्लील मेसेजेस पाठवीत होता. मी आधी दुर्लक्ष करत त्याला ब्लॉक केले. पण, आता मी हा लढा सामान्य स्त्रीप्रमाणे लढवण्याचा निर्णय घेतला आहे.


## डीआयएल लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** डीआयएल कॉम्प्लेक्स, घोडबंदर रोड, माजीवाडा, ठाणे (पश्चिम) - ४०० ६१०. दूर. : + ९१ - २२ - ६७९८ ०८००/८८८,
फॅक्स : + ९१ - २२ - ६७९८ ०८९९, ई-मेल : contact@dil.net वेबसाइट : www.dil.net
सीआयएन नं. : L99999MH1951PLC008485

### दि. ३० जून, २०१६ रोजी संपलेल्या तिमाहीकरिताच्या एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा सारांश

(₹ लाखांत, प्रतिशेअर माहिती वगळता)

| तपशील | ३०.०६.२०१६ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०१६ रोजी संपलेली तिमाही (लेखापरीक्षित) | ३०.०६.२०१५ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) |
|---|---|---|---|
| परिचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ४,२४७.७४ | ४,२५७.६३ | ३,८००.२९ |
| करपश्चात सामान्य कामकाजातून निव्वळ नफा/(तोटा) | १३०.१५ | (१८२.४४) | १९८.५४ |
| करपश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (असामान्य बाबींपश्चात) | १३०.१५ | (१८२.४४) | १९८.५४ |
| समभाग भांडवल | २२९.३२ | २२९.३२ | २२९.३२ |
| राखीव (गत वर्षीच्या ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार पुनर्मूल्यांकन राखीव वगळता) | १२,७५२.६९ | १२,७५२.६९ | १२,९३२.८८ |
| | (दि. ३१.०३.२०१६ रोजीनुसार) | (दि. ३१.०३.२०१६ रोजीनुसार) | (दि. ३१.०३.२०१५ रोजीनुसार) |
| प्रतिशेअर उत्पन्न (ईपीएस) (असामान्य बाबींपूर्व) (प्रत्येकी रु. १०/-) # - मूलभूत (₹) - सौम्यीकृत (₹) | ०.०५ ०.०५ | (१२.९२) (१२.९२) | ५.६३ ५.६३ |
| प्रतिशेअर उत्पन्न (ईपीएस) (असामान्य बाबींपश्चात) (प्रत्येकी रु. १०/-) # - मूलभूत (₹) - सौम्यीकृत (₹) | ०.०५ ०.०५ | (१२.९२) (१२.९२) | ५.६३ ५.६३ |
| # तिमाहीकरिताचा ईपीएस वार्षिकीकृत नाहीत. | | | |

### स्थायी वित्तीय सारांश

(₹ लाखांत)

| तपशील | ३०.०६.२०१६ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०१६ रोजी संपलेली तिमाही (लेखापरीक्षित) | ३०.०६.२०१५ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) |
|---|---|---|---|
| परिचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | १९४.८४ | १९६.३६ | १९७.१८ |
| करपश्चात सामान्य कामकाजातून निव्वळ नफा/(तोटा) | (३२८.३९) | (५२०.१४) | (९२.२४) |
| करपश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (असामान्य बाबींपश्चात) | (३२८.३९) | (५२०.१४) | (९२.२४) |

**टीप :**

वरील विवरण हे सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल करण्यात आलेल्या तिमाही वित्तीय निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाइट **www.bseindia.com** वर व कंपनीची वेबसाइट **www.dil.net** वर उपलब्ध आहे.


डीआयएल लिमिटेडकरिता
कृष्णा दातला
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन क्र. : ०००० ३२४७

ठिकाण : ठाणे
दिनांक : १२ ऑगस्ट २०१६

DIL/63/PREM ASSOCIATES


# संसद मात्र पंतप्रधानमुक्त

## काँग्रेस नेते कपिल सिब्बल यांची खोचक टीका



कपिल सिब्बल

नवी दिल्ली, ता. १३ (यूएनआय) : नुकत्याच संपलेल्या पावसाळी अधिवेशना-दरम्यान संसदेमध्ये विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा सुरू असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी मात्र यामध्ये सहभागी न झाल्याने काँग्रेस पक्ष संतापला आहे. याखेपेस देशाने पंतप्रधानमुक्त संसद पाहिल्याचा टोला काँग्रेस नेते आणि राज्यसभा सदस्य कपिल सिब्बल यांनी लगावला.

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये काश्मीरच्या विषयावर चर्चा झाली; पण त्यावेळेस पंतप्रधान मोदी उपस्थित नव्हते. दलितांवरील अत्याचाराचा मुद्दा चर्चेला आला तेव्हाही पंतप्रधान अनुपस्थित होते, अरुणाचल आणि उत्तराखंडमधील राज्यपालांच्या भूमिकेवर चर्चा सुरू असताना पंतप्रधानांनी या वेळीही दांडी मारली.

आमची संसद आता पंतप्रधानमुक्त झाली आहे. एकीकडे पंतप्रधान मोदी आपण राज्यघटनेचा सन्मान करतो असे सांगतात, दुसरीकडे संसदेमध्ये उपस्थित राहत नाहीत. पंतप्रधानांना प्रश्नांना उत्तरे द्यायची सवय नसल्याचे त्यांनी नमूद केले. मोदी लोकांना उद्देशून भाषण करतात; पण ते संसदेमध्ये बोलू शकत नाहीत. सभेमध्ये कोणी प्रश्न करत नाही; पण संसदेमध्ये प्रश्नांना सामोरे जावे लागत असल्याने मोदींना सभागृहामध्ये बोलण्याची सवय राहिलेली नाही, असे त्यांनी सांगितले.

### दलित अत्याचारांनाही जबाबदार

**देशभरात दलितांवर होणाऱ्या अत्याचारांना पंतप्रधानच जबाबदार आहेत. मोदी स्वतःला देशाचा चौकीदार म्हणवून घेतात, त्यामुळे दलितांवर होणाऱ्या अत्याचारांची जबाबदारीही त्यांनी घ्यायला हवी. त्यांनी देशाचे वॉचमन खुशाल राहावे; पण त्याचबरोबर जनतेच्या प्रश्नांनाही उत्तरे द्यावीत, असे सिब्बल यांनी स्पष्ट केले.**



**न्यायालयाने मोदींना वास्तवाची जाणीव करून दिली असून हे काही मोदींचे, मोदींच्या माध्यमातून मोदींसाठी चालविले जाणारे सरकार नाही.**
**- राहुल गांधी,** काँग्रेस उपाध्यक्ष

### पुढील अधिवेशनात चर्चा

संसदेच्या पुढील अधिवेशनामध्ये पंतप्रधानांच्या अनुपस्थितीचा विषय आम्ही संसदेमध्ये मांडणार आहोत, असे सिब्बल यांनी नमूद केले. मोदी हे प्रश्नांना घाबरतात. गुजरातचे मुख्यमंत्री असताना देखील ते विधिमंडळात अशाच पद्धतीने वावरत असत. देशातील जनता २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये त्यांना सडेतोड उत्तर देईल, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान सिब्बल यांच्या आरोपावर भाजप नेते काय उत्तर देतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.


## डहाणू नगर परिषद, डहाणू

ता. डहाणू, जि. ठाणे

### ई-निविदा सूचना

मुख्य अधिकारी, डहाणू नगर परिषद, बांधकाम विभागाकडील विविध विकासकामांच्या शासनाकडील आवश्यक त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ई-निविदा मागवीत आहेत.

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | कोरे निविदा फॉर्म डाऊनलोड करणे. | दिनांक १३.०८.२०१६ ते ३०.०८.२०१६ |
| २ | निविदा अपलोड करणे. | निविदा प्रसिद्धीपासून दिनांक ३०.०८.२०१६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३ | स्वीकृत निविदा उघडणे. | दिनांक ०१.०९.२०१६ सकाळी १२.०० वाजेपासून |

सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३.०८.२०१६ ते ३०.०८.२०१६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या ई-निविदा ३०.०८.२०१६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. तसेच वैध निविदा ०१.०९.२०१६ रोजी सकाळी १२.०० वा.पासून उघडण्यात येतील.

**अटी व शर्ती :-**

१. ठेकेदारांनी ई-निविदा भरताना दोन लिफाफा पद्धतीचा अवलंब करावा, तसेच क्र. १ च्या लिफाफ्यात तांत्रिक बाबीची कागदपत्रे स्कॅन करून पी.डी.एफ. फॉर्मेट (PDF Format) मध्ये अपलोड करावीत. लिफाफा क्र. २ हा तांत्रिक बोलीचा असेल.
२. निविदा फॉर्म फी व इसारा e-Payment पद्धतीने स्वीकारण्यात येतील.
३. ई-निविदा प्रणालीबाबत काही शंका असल्यास त्याचे निरसन ०२५२८-२२४४६२ या हेल्पलाईनवर करून देण्यात येईल.
४. इतर सविस्तर अटी व शर्ती ई-निविदा फॉर्ममध्ये व न.प. कार्यालय नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.
५. अपलोड केलेले कागदपत्राची मूळ प्रत पडताळणीकरिता व झेरॉक्स दिनांक ०१.०९.२०१६ रोजीपर्यंत आवक विभागात बंद लिफाफ्यात सकाळी ११.३० वाजेपर्यंत सादर करण्याची आहे.

जा.क्र. : डनप/१८९९/२०१६-१७
दिनांक : १२/०८/२०१६

| सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|---|
| नगर अभियंता | मुख्य अधिकारी | सभापती सार्व. बांधकाम समिती | उप नगराध्यक्ष | नगराध्यक्षा |

ड हा णू न ग र प रि ष द


## पाकिस्तानच्या कर्मचाऱ्यांची तालिबानकडून सुटका

इस्लामाबाद, ता. १३ (पीटीआय) : पाकिस्तानच्या हेलिकॉप्टरमधील कर्मचाऱ्यांची तालिबानांनी नऊ दिवसांनंतर शनिवारी सुटका केली.

पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील 'एमआय-१७' हे मालवाहतूक करणारे सरकारी हेलिकॉप्टर दुरुस्तीसाठी रशियाला जात असताना तांत्रिक बिघाड होऊन गेल्या गुरुवारी अफगाणिस्तानमधील लोगार प्रांतात कोसळले होते. हा भाग तालिबान संघटनेच्या नियंत्रणाखाली आहे. तालिबान्यांनी हेलिकॉप्टरमधील सहा कर्मचाऱ्यांना ओलिस ठेवले होते. कर्मचाऱ्यांमध्ये पाच पाकिस्तानी, एक रशियन तंत्रज्ञाचा समावेश आहे.

त्यांच्या सुटकेसाठी स्थानिक टोळीतील ज्येष्ठ लोकांनी प्रयत्न केले. त्यांची बोलणी यशस्वी ठरून तालिबान्यांनी कर्मचाऱ्यांची सुटका केली. पाकिस्तानचे परराष्ट्र खात्याचे प्रवक्ते नफीस झकारिया यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.